# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१७ ऑगस्ट, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7447744100 (PRO)

## चंद्रपुर जिल्हा शांतता समितीची बैठक संपन्न

### आगामी गणेशोत्सव पोळा व मोहर्रम संबंधाने चर्चा व मार्गदर्शक सुचना

### गणेशोत्सव मर्यादीत व घरच्या घरी साजरा करण्याचे आवाहन

दिनांक १७/०८/२०२० रोजी पोलीस मुख्यालय ड्रिल शेड येथे ०३:०० वाजता आगामी गणेश उत्सव संबंधाने जिल्हा शांतता समिती व जिल्हयातील गणेश मंडळांची बैठक घेण्यात आली. सदर सभेमध्ये उपस्थित लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे अधिकारी यांनी सद्यास्थितीत वाढता कोरोना विषाणु प्रादुर्भाव लक्षात घेता चंद्रपुर जिल्हयात गणेश उत्सव २०२० हा सण अत्यंत साध्या पदध्तीने व शासनाने वेळोवेळी दिलेल्या नियमांचे तसेच सोशल डिस्टंसिंगचे पालन करून साजरा करणे अत्यंत आवश्यक झाले असुन चंद्रपुर जिल्हयात सद्यस्थितीत ७० ते ७५ कंन्टेन्टमेंट झोन असल्याचे लक्षात घेता चंद्रपुरकरांनी आगामी गणेशोत्सव २०२० मध्ये ठराव घेवुन सार्वजनिकरित्या श्री. गणेशाची स्थापना न करता घरीच श्री.गणेश मुर्तीची स्थापना करून चंद्रपुर जिल्हयाच्या एक वेगळा आदर्श निर्माण करावा असे आवाहन केले. तसेच गणेशोत्सवसह पोळा, तान्हा पोळा व मोहर्रम हा सण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशानुसार शांततेत पार पाडावा.

कोरोना विषाणुच्या पार्श्वभुमिवर मा. प्रधान सचिव(विशेष), गृह विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रकान्वये निर्ममित करण्यात आलेल्या सुचनांचे पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहे. ज्यामध्ये १) सार्वजनिक गणेशोत्सावासाठी गणेशोत्सव मंडळांनी पोलीस विभागाची व स्थानिक स्वराज्य संस्थेची येथोचित पुर्वपरवाणगी घेणे आवश्यक राहील. २) या वर्षी शक्यतो पारंपररीक गणेशमुर्ती ऐवजी घरातील धातु/संगमरवर/लाकडी/बांबु पासुन तयार केलेल्या मुर्तीचे पुजन करावे. ३) उत्सवाकरीता वर्गणी/देणगी भावीकांनी /नागरीकांनी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्विकार करावा परंतु घरोघरी जावुन वर्गणी मागणेस मनाई आहे. ४) नागरीक आकर्षित होवुन गर्दी करू नये याकरीता कोणत्याही प्रकारच्या व्यावसायीक/वैयक्तीत जाहीरातीच्या प्रदर्शनातस मनाई असेल. ५) श्रीगणेशाचे दर्शनाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट, व फेसबुक इत्यादीद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करावी. ६) जमावबंदी सीआरपीसी १९७३ कलम १४४ अंतर्गत आदेशाने तंतोतंत पालन करावे. ७) कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी व्यक्तींमध्ये भौतीक दृष्टया कमीत कमी संपर्क येईल याची दक्षता घ्यावी. ८) लोकप्रतिनिधी, स्वंयसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मदतीने कृत्रीम तलावांची निर्मीती करावी. ९) श्रीगणेशची मुर्ती सार्वजनीक मंडळाकरीता ४ फुट तर घरगुती करीता २ फुटांच्या मर्यादीत असावी. १०) कंटेंन्टमेंट झोन मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यास सक्त मनाई आहे. आणि कंटेंन्टमेंट झोनमधील व्यक्तीला बाहेरील गणेशोत्सवात सहभागी होता येणार नाही. तसेच कंटेन्टमेंट झोन मध्ये ये—जा करण्यास मनाई राहील. इत्यादी सुचनांने व स्थानिक प्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले निर्देश आणि सुचनांचे पालन करावे. सदर सभेमध्ये मा. श्री. सुरेश उर्फ बाळुभाउ धानोरकर, खासदार चंद्रपुर यांनी गणेशोत्सव साजरा करतांना सर्व घरगुती व सार्वजनिक गणेश मंडळामध्ये मातीपासुन तयार करण्यात आलेल्या कमी उंचीच्या मुर्तीची स्थापना करण्याचे तसेच सार्वजनिक स्वरूप न देता घरच्या घरीच उत्सव साजरा करावा असे आवाहन केले. तसेच मा. श्री. किशोर जोरगेवार, आमदार, मा. सौ. राखी कंर्चलावार महापौर चंद्रपुर, डॉ. मंगेश गुलवाडे व इतर मान्यवरांनी सुध्दा सार्वजनिक गणेश मंडळ ऐवजी घरगुती गणेशोत्सव साजरा

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7447744100 (PRO)

करून कोरोनावर मात करणेबाबत आपले मनोगत व्यक्त करून यंदाचा गणेशोत्सव सण आदर्शरित्या पार पाडण्याबाबत सर्व संबंधीत गणेश मंडळांना आवाहन केले.

सदर सभेमध्ये मा. श्री. सुरेश उर्फ बाळुभाउ धानोरकर खासदार, मा. श्री. किशोर जोरगेवार आमदार, मा. सौ.राखी कंर्चलावार महापौर चंद्रपुर, डॉ.श्री. महेश्वर रेडड्ी पोलीस अधीक्षक चंद्रपुर, श्री. अजय गुल्हाने जिल्हाधीकारी चंद्रपुर, श्री. राजेश मोहिते, आयुक्त चंद्रपुर शहर मनपा, श्री. राहुल कर्डिले मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. चंद्रपुर,, श्री. प्रशांत खैरे, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर, श्रीमती विद्युत वरखेडकर, अपर जिल्हाधिकारी चंद्रपुर, श्रीमती कर्डिले पाटील, उपजिल्हाधिकारी चंद्रपुर, श्रीमती डबाले, सहायक धर्मदाय आयुक्त चंद्रपुर, एसडीपीओ चंद्रपुर श्री. शिलवंत नांदेळकर, पोलीस उपअधीक्षक गृह चंद्रपुर श्री. शेखर देशमुख, एसडीपीओ वरोरा श्री. निलेश पांडे, एसडीपीओ गडचांदुर श्री. विलास यामावार, एसडीपीओ राजुरा श्री. स्वप्निल जाधव, श्री. शिंदे उपप्रादेशीक परिवहन अधिकारी चंद्रपुर, कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.लि. चंद्रपुर, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपुर संपुर्ण जिल्हा शांतता समिती सदस्य, तालुका शांतता समिती सदस्य, नगर शांतता समिती सदस्यसह जिल्हयातील विविध स्वंयसेवी संस्थेचे पदाधिकारी सदस्यासह जिल्हयातील व शहरातील गणेश मंडळाचे पदाधिकारी हजर होते.

---